# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - १४८

**सभावृत्तांत**

दिनांक- ५.१.२०१० वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार दिनांक ५.१.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती - सभापती
२. मा.भोंडवे गणेश तुकाराम
३. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
४. मा.साळुंखे सुरेखा मारुती
५. मा.पिल्ले राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी
६. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
७. मा.कदम निर्मला सद्‌गुरु
८. मा.अशोक दशरथ सोनवणे
९. मा.जगदीश शंकर शेट्टी
१०.मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
११.मा.प्रशांत कृष्णराव शितोळे
१२. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
१३. मा.रामदास तानाजी कुंभार
१४. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
१५. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
१६. मा.सौ.सुलोचना बबन बढे

याशिवाय मा.आशिष शर्मा - आयुक्त,मा.डुंबरे - अति.आयुक्त,मा.देशमुख,मा.सावंत,मा.गायकवाड,मा.भोसेकर,मा.पवार, मा.मुंढे,मा.गायकवाड -सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.उगीले-शहर अभियंता, मा.सुरगुडे -विकास अभियंता,मा.चव्हाण - अति.शहर अभियंता,मा.डॉ.कुणचगी - आरोग्य वैद्यकिय अधिकारी,मा.डॉ.अय्यर - वैद्यकिय संचालक,मा.लोंढे-मुख्यलेखापाल, मा.चव्हाण,मा.जाधव, मा.निकम, मा.इंगळे, मा.दुधेकर,मा.थोरात, मा.साळवी, मा. जाधव,मा.बनकर, मा.कुदळे, -कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-

विषय क्रमांक ३४) सावित्रीबाई फुले जयंती महोत्सव साजरा करणेबाबत..

विषय क्रमांक ३५) मोशी कचरा डेपो येथे मुरुम पुरविणेबाबत..

विषय क्रमांक ३६) मानधनावर नेमणुक देणेबाबत.. मा.जगदीश शेट्टी,मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३७) नुकसान भरपाई देणेबाबत..मा.नितीन ओव्हाळ,मा.जगदीश शेट्टी यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ३८) निविदा नोटीस क्र. १५/२००९ - १० मधील कामांचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत..

विषय क्रमांक ३९) सब वे व भुयारी मार्गाची देखभाल करणेबाबत..मा.राजेश पिल्ले,मा.जगदीश शेट्टी यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ४०) ई-गव्हर्नन्सचे सॉफ्टवेअर बनविणेचे काम करुन देणेबाबत..मा.सुरेखा साळुंखे,मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव..

--------------

दिनांक २९.१२.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १४७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------------

ठराव क्रमांक- १०१५० विषय क्रमांक- १
दिनांक- ५.१.२०१० विभाग- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/३८६/०९ दि.१०/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, प्र.क्र.८७ वाकड गावठाण मधील पोस्टल कॉलनी, पोलिस कॉलनी व परिसरातील रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.मोहनलाल मथरानी कंन्ट्रक्शन प्रा.लि. (नि.र.रू.२८,०१,१०९/- [र.रू.अठ्ठावीस लाख एक हजार एकशे नऊ] पेक्षा २५.२९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १०१५१ विषय क्रमांक- २
दिनांक- ५.१.२०१० विभाग- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.निर्मला कदम
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/३८७/०९ दि.१०/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/२००९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, प्र.क्र.८७ वाकड गावठाण मधील सायली गार्डन, ताम्हाणेवस्ती व परिसरातील रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.मोहनलाल मथरानी कंन्ट्रक्शन प्रा.लि. (नि.र.रू.२८,०१,०३०/- [र.रू.अठ्ठावीस लाख एक हजार तीस] पेक्षा २५.२९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१५२ विषय क्रमांक- ३
दिनांक- ५.१.२०१० विभाग- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/३८८/०९ दि.१०/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/२००९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, प्र.क्र.८७ वाकड गावठाण मधील कळमकर वस्ती व वाघमारवस्ती व परिसरातील रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.मोहनलाल मथरानी कंन्ट्रक्शन प्रा.लि. (नि.र.रू.२८,०१,११४/- [र.रू.अठ्ठावीस लाख एक हजार एकशे चौदा] पेक्षा २६.१० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१५३ विषय क्रमांक- ४
दिनांक- ५.१.२०१० विभाग- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/३८९/०९ दि.१०/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/२००९-१० मधील अ.क्र.४ अन्वये, प्र.क्र.८७ वाकड गावठाण मधील नंदनवन कॉलनी व श्री नर्सरी व परिसरातील

रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.मोहनलाल मथरानी कंन्ट्रक्शन प्रा.लि. (नि.र.रू.४२,०१,६७७/- [र.रू.बेचाळीस लाख एक हजार सहाशे सत्याहत्तर] पेक्षा २६.१९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१५४ विषय क्रमांक- ५
दिनांक- ५.१.२०१० विभाग- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/३९०/०९ दि.१०/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/२००९-१० मधील अ.क्र.५ अन्वये, प्र.क्र.८७ वाकड गावठाण मधील पारखे वस्ती, भगवादेनगर व परिसरातील रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.मोहनलाल मथरानी कंन्ट्रक्शन प्रा.लि. (नि.र.रू.४६,५९,३०५/- [र.रू.शेहचाळीस लाख एकोणसाठ हजार तीनशे पाच] पेक्षा २६.२८ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१५५ विषय क्रमांक- ६
दिनांक- ५.१.२०१० विभाग- आरोग्य मुख्य
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.निर्मला कदम
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमु/३/कावि/६५१/०९ दि.१४/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

दि.५/११/०९ रोजी मोशी कचरा डेपो येथे आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊन अचानक कचऱ्याने पेट घेतला होता. त्यावर तातडीने उपाययोजना करणेकामी मे.साई एंटरप्रायजेस यांच्यामार्फत दि.१९/१०/०९ पासून २ बुलडोझर व मे.नॅशनल अर्थ मुव्हर्स यांच्यामार्फत दि.५/११/०९ पासून जादा ३ बुलडोझर लावून दि.१२/११/०९ पर्यंत कामकाज पुर्ण करून घेणेत आले आहे मे.साई एंटरप्रायजेस यांच्यामार्फत मागील मान्य दर प्रती तास र.रू.११५० + १०.३ या दराने एकूण ५०० तासाचे एकूण

र.रू.६,३४,२२५/- व मे.नॅशनल अर्थ मुव्हर्स यांच्यामार्फत आपत्कालीन परिस्थिती मध्ये दि.५/११/०९ ते दि.१२/११/०९ या कालावधीमध्ये जादा ३ बुलडोझ - राच्या सहाय्याने केलेल्या कामाचे एकूण तास २४० दिवस यापुर्वीचे मान्य निविदा दर प्रतितास र.रू.१२००/- + १०.३० सेवाकरासह एकूण र.रू. ३,१७,६६४/- या खर्चास तसेच दि.१३/११/०९ पासून मे.नॅशनल अर्थ मुव्हर्स यांच्यामार्फत प्रती तास र.रू.१२०० + १०.३० सेवाकर या दराने करारनामा न करता थेट पध्दतीने नव्याने निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत प्रतिदिन २ बुलडोझरच्या सहाय्याने कचरा सपाटीकरणाचे काम करून घेण्यास व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१५६ विषय क्रमांक- ७
दिनांक- ५.१.२०१० विभाग- आरोग्य मुख्य
सुचक- मा.ज्ञानेश्वर भालेराव अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमु/३/कावि/६४५/०९ दि.१४/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेउन -

मनपाच्या आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.२/२००९-१० अन्वये, मोशी कचरा डेपो येथे दैनंदिन जमा होणारा कचरा बुलडोझर च्या सहाय्याने सपाटीकरणाचे काम करणेकामी मे.नॅशनल अर्थ मुव्हर्स [निविदा रकमेच्या २.६ % कमी दर (प्रती तास र.रू. १४१८/-) एकुण र.रू.२७,५७,५४६/- [र.रू.सत्तावीस लाख सत्तावन्न हजार पाचशे शेहचाळीस] ] यांचेशी कामाचा करारनामा करणेस व खर्चास मान्यता देणेत यावी अशी मागणी मा.आयुक्त यांजकडुन करणेत आली असली तरी मार्च २०१० अखेरपर्यंतच्या कामाचा करारनामा करणेस व खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१५७ विषय क्रमांक- ८
दिनांक- ५.१.२०१० विभाग- वायसीएम
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/१/कावि/२११/०९
दि.१७/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

वाय.सी.एम.रूग्णालयाकरिता तातडीने लागणारे औषधे / साहित्य खरेदी करणेकामी प्रस्तावा सोबत जोडलेल्या प्रपत्रात नमुद केलेनुसार पुरवठाधारकांशी योग्य तो करारनामा करून आदेशाचे दिनांकापासून २ वर्षे कालावधी करिता एजन्सी निश्चित करणेस तसेच मे.कोठारी मेडीकल पिंपरी वाय.सी.एम.रुग्णालयासमोर संत तुकाराम नगर, पिंपरी - १८ हे मागील सहा वर्षापासून वाय.सी.एम.रुग्णालयास औषधे/साहित्य पुरवठा करीत असून त्यांना काही तांत्रिक अडचणीमुळे निविदा भरता आली नसुन ते इतर निविदाधारकां प्रमाणे M.R.P वर १२.५% सुट देवुन औषधे/साहित्य पुरवठा करणेस तयार असलेने त्यांच्या सोबत पण करारनामा करुन पुरवठा धारक यादीमध्ये त्यांस समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१५८ विषय क्रमांक- ९
दिनांक- ५.१.२०१० विभाग- पशुवैद्यकिय
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पवै/१/कावि/७७५/०९दि.२१/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पशुवैद्यकीय विभागाकडील पशुगणना कामी येणारा खर्च या लेखाशिर्षावरील र.रू.३,००,०००/- एवढी तरतूद ठेकेदार पध्दतीने कत्तोलोतर घाणीची विल्हेवाट लावणे या लेखाशिर्षावर तसेच कत्तलखाना उपकरणे व साहित्य या लेखाशिर्षावरील र.रू.२,००,०००/- एवढी तरतूद मृत जनावरांची विल्हेवाट या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१५९ विषय क्रमांक- १०
दिनांक- ५.१.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.सुरेखा साळुंखे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/२८८/०९दि.२२/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९/२००९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, वॉर्ड क्र.५९ वाल्हेकरवाडी मधील साखळी रस्त्याचे डांबरीकरण करणेकामी मे.मोहनलाल मथरानी कन्स्ट्रक्शन प्रा.लिमी.(नि.र.रू.१६,७९,५३४/- [र.रू.सोळा लाख एकोणऐंशी हजार पाचशे चौतीस] पेक्षा २५.९२ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१२,४४,१९९/- [र.रू. बारा लाख चव्वेचाळीस हजार एकशे नव्यान्नव] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१६० विषय क्रमांक- ११
दिनांक- ५.१.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/२८९/०९दि.२२/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९/२००९-१० मधील अ.क्र.४ अन्वये, वॉर्ड क्र.५९ वाल्हेकरवाडी मधील शेवंतीबन कॉलनी, सायली कॉम्प्लेक्स, भोंडवे वस्ती व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणेकामी मे.मोहनलाल

मथरानी कन्स्ट्रक्शन कं.(नि.र.रू.१९,६०,२८३/- [र.रू.एकोणीस लाख साठ हजार दोनशे त्र्याऐंशी] पेक्षा २५.६३ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१४,५७,८६२/- [र.रू. चौदा लाख सत्तावन्न हजार आठशे बासष्ठ] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१६१ विषय क्रमांक- १२
दिनांक- ५.१.२०१० विभाग- वैद्यकिय
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभा/०४/कावि/५५०/०९दि.१६/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

वाय.सी.एम.रूग्णालयातील स्टेप डाऊन आय.सी.यु. विभागा करिता आवश्यक लागणारे ७ नग एरिया आलार्म पॅनलची खरेदी मागील नि.नो.क्र.६/२००८-२००९ मधील लघुत्तम निविदाधारक मे.कृष्णा एन्टरप्रायजेस यांचेकडून करारनामा करून खरेदी कामी येणाऱ्या र.रू.१६,२४,०००/- [र.रू.सोळा लाख चोविस हजार] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१६२ विषय क्रमांक- १३
दिनांक- ५.१.२०१० विभाग- अ प्रभाग
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.अप्र/कावि/१०७५/०९दि.२२/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-२०१० मधील अ.क्र.४६ अन्वये, प्रभाग क्र.३७, ४९, ५०, ५३, ५४ व ५५ मधील डांबरी रस्त्याचे किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.पी.ए.कृपलानी (नि.र.रू.६,९३,२८२/- [र.रू.सहा लाख त्र्यान्नव हजार दोनशे ब्याऐंशी] पेक्षा २२.५९ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१६३ विषय क्रमांक- १४
दिनांक- ५.१.२०१० विभाग- अ प्रभाग
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.अप्र/कावि/१०७६/०९दि.२२/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-२०१० मधील अ.क्र.४७ अन्वये, प्रभाग क्र.३८, ३९, ४० व ४१ मधील डांबरी रस्त्याचे किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.पी.ए.कृपलानी (नि.र.रू.७,००,१०९/- [र.रू.सात लाख एकशे नऊ] पेक्षा २२.५९ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१६४ विषय क्रमांक- १५
दिनांक- ५.१.२०१० विभाग- अ प्रभाग
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.अप्र/कावि/१०७७/०९दि.२२/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-२०१० मधील अ.क्र.८६ अन्वये, प्रभाग क्र.५, ६, ७ व ८ मधील डांबरी रस्त्याचे किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.पी.ए.कृपलानी (नि.र.रू.६,९३,२७८/- [र.रू.सहा लाख त्र्यान्नव हजार दोनशे अठ्ठ्याहत्तर] पेक्षा २२.६० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१६५ विषय क्रमांक- १६
दिनांक- ५.१.२०१० विभाग- विद्युत मुख्य
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.विद्युत/नि/१/कावि/३६९/०९दि.२३/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१८/०७/०८ मधील अ.क्र.१८ अन्वये, प्र.क्र.४७ निगडी वसाहत परिसरातील रस्त्याला अडथळा करणारे धोकादायक लघुदाब पोल व तारा हलविणेकामी मे.श्री.स्वामी समर्थ इले.कार्पोरेशन (निविदा दराने) (स्विकृत योग्य दरापेक्षा ४.७७ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

(नि.र.रु.२१,९६,९६२/- (र.रु.एकवीस लाख शहाण्णव हजार नउशे बासष्ठ)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१६६ विषय क्रमांक- १७
दिनांक- ५.१.२०१० विभाग- पाणीपुरवठा
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.पापु/नि/कावि/१७४६/०९दि.२९/१२/०९

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागा कडील नि.नो.क्र.५/०९-१० मधील अ.क्र.५ अन्वये, पेठ क्र.२३ निगडी येथे जलशुध्दीकरण केंद्रा तील क्लोरीनेटर्सची देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकामी मे.अचला इंजि.ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स (नि.र.रू.४,९५,३९१/- [र.रू.चार लाख पंच्यान्नव हजार तीनशे एक्यान्नव] पेक्षा ०.५०% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१६७ विषय क्रमांक- १८
दिनांक- ५.१.२०१० विभाग- प्रशासन
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/२/कावि/१८७०/०९दि.२९/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

शासनाकडुन पदे मंजुर होईपर्यंत वाहनचालकांची आवश्यकता विचारात घेउन वाहनचालक श्री.सगर शाहुराज सुदाम या कर्मचा-यास दि.१६.१.२०१० पासून आणखी ६ महिने कालावधीसाठी र.रु.८०००/- दरमहा एकत्रित मानधनावर नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१६८ विषय क्रमांक- १९
दिनांक- ५.१.२०१० विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/१०/कावि/२८८/०९दि.२९/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या सार्वजनिक वाचनालय विभागास पुस्तके खरेदीकामी ई निविदा सुचना क्र.१५/२००९ - १० अन्वये लघुत्तम निविदाकार १) मे, जयेश एजन्सी, पुणे यांचेकडुन ४९४ पुस्तके १८ वाचनालयासाठी प्रत्येकी एक सेट र.रु.१२,२०,०८८/- मध्ये व २)शुभम साहीत्य पुणे यांचेकडुन ६ पुस्तकांचा एक सेट प्रत्येकी १८ वाचनालयासाठी र.रु.८,१५४/- असे एकुण ५०० पुस्तकांचा एक सेट प्रमाणे १८ सेट एकुण र.रु.१२,२८,२४२/- मध्ये खरेदीकामी करारनामा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१६९ विषय क्रमांक- २०
दिनांक- ५.१.२०१० विभाग- पाणीपुरवठा
सुचक- मा.ज्ञानेश्वर भालेराव अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/जनि/१७४९/२००९ दि.२९/१२/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागा कडील नि.नो.क्र.३/०९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, Providing installing,integrating and Automation with PLC/SCADA of existing WTP and ESR at Various locations in PCMC area कामी मे.रेक्ट्रॉनिक डिव्हाईसेस ॲण्ड सिस्टीम्स (नि.र.रू.१२,२३,१०,४६४/- [र.रू.बारा कोटी तेवीस लाख दहा हजार चारशे चौसस्ठ] पेक्षा २.१०% कमी) [भाववाढ फरक कलमासह]या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१७० विषय क्रमांक- २१
दिनांक- ५.१.२०१० विभाग- पाणीपुरवठा
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/जनि/१७४७/२००९ दि.२९/१२/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागा कडील नि.नो.क्र.५/०९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, से.क्र.२३ निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्राचे यांत्रिकी व तांत्रिक विषयक देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकामी सिध्दी गणेश एंटरप्रायजेस (नि.र.रू.२३,३४,२४०/- [र.रू. तेवीस लाख चौतीस हजार दोनशे चाळीस] पेक्षा १४.२२% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१७१ विषय क्रमांक- २२
दिनांक- ५.१.२०१० विभाग- पाणीपुरवठा
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/जनि/१७४८/२००९ दि.२९/१२/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागा कडील नि.नो.क्र.३/०९-१० मधील अ.क्र.४ अन्वये,पिंपरी चिंचवड मनपाचे से.२३ येथील जलशुध्दीकरण केंद्रासाठी पॉली इलेक्ट्रोलाईट केमिकल पुरविणेकामी मे.एनपी केमट्रीट इंजिनिअरींग कंपनी (२४० प्रतिकिलो ) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. (नि.र.रु.२४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१७२ विषय क्रमांक- २३
दिनांक- ५.१.२०१० विभाग- पाणीपुरवठा
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/जनि/१७५२/२००९ दि.३०/१२/२००९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागा कडील नि.नो.क्र.४/०९-१० मधील अ.क्र.१ अन्वये,ब प्रभागा अंतर्गत तानाजीनगर भागात पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी डी.आय.जलवाहिनी पुरविणे व टाकणे कामी मे.संजय कॉन्ट्रॅक्टर (नि.र.रू.२,१८,७०,८४५/- [र.रू. दोन कोटी अठरा लाख सत्तर हजार आठशे पंचेचाळीस] पेक्षा (२०.९९ % कमी )(भाववाढ फरक कलमासह) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१७३ विषय क्रमांक- २४
दिनांक- ५.१.२०१० विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/१/कावि/४७१/२००९ दि.२९/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

सायकली व शिवणयंत्रे खरेदीकामीची ई - निविदा सुचना क्र.१६/१ ते २ /२००९ - १० चे प्रकटन दै.सकाळ,दै.लोकमत,दै.लोकसत्ता या वृत्तपत्रांनी राज्यस्तरावर प्रसिध्द केली असल्याने निविदा प्रकटन प्रसिध्दीचे बिल दै.सकाळ यांना र.रु.१,००,८००/- व दै.लोकमत यांना र.रु.९७,२४०/- दै.लोकसत्ता यांना र.रु.१,२५,६६४/- याप्रमाणे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१७४ विषय क्रमांक- २५
दिनांक- ५.१.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/अस्था/१/कावि/१४९९/०९ दि.२९/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे निर्माण करणेत आलेल्या वाहतुक शाखेमार्फत सर्व प्रकारची वाहतुक सुरळित व सुलभ होणेचे दृष्टीने वाहतुक तांत्रिक सल्लागार (असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लॅनर) पदावर श्री.भुमकर एस.एन.सेवानिवृत्त सहा.पोलीस आयुक्त यांची दि.२८.८.०९ पासून पुढे सहा महिने कालावधीकरीता दरमहा र.रु.१२,०००/- या एकत्रित मानधनावर नेमणुक करणेस व कामाचा पाठपुरावा करणेकामी वाहनचालकासह महापालिकेचे वाहन व भ्रमणध्वनीकरीता महापालिका ग्रुपचे सिमकार्ड उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१७५ विषय क्रमांक- २६
दिनांक- ५.१.२०१० विभाग- विद्युत (ब प्रभाग)
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/बप्र/जा/१३३८/०९ दि.२९/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

ब प्रभागांतर्गत वॉर्ड क्र.५९ व ६० बिजली नगर व चिंचवडे नगरमधील सो.व्हे.दिवे दुरुस्त करणे व केबल टाकणेचे काम तातडीने करावयाचे असलेने मे.ऋषिकेश एन्टरप्रायझेस यांचेकडुन अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ३.५% कमी दराने करारनामा करुन कोटेशन पध्दतीने करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. (अं.र.रु.५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१७६ विषय क्रमांक- २७
दिनांक- ५.१.२०१० विभाग- विद्युत (ब प्रभाग)
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र. वि/बप्र/जा/१३३७/०९ दि.२९/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

ब प्रभागांतर्गत किवळे जकात नाका येथील जनरेटर दुरुस्ती करणेचे काम तातडीने करावयाचे असलेने मे.ऋषिकेश एन्टरप्रायझेस यांचेकडुन अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १.२% कमी दराने करारनामा करुन कोटेशन पध्दतीने करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. (अं.र.रु.५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१७७ विषय क्रमांक- २८
दिनांक- ५.१.२०१० विभाग- आरोग्य मख्यालय
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उशोप/कावि/६७५/०९ दि.३०/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या आरोग्य मुख्य कार्यालयाच्या कार्यालयीन वापरासाठी मे.राजकुमार कासार यांचे टाटा सुमो न.एम.एच - १४ ए.एम.८९१५ हे वाहन प्रतिदिन ८० कि.मी पर्यंत र.रु.६००/- या दराने भाडे तत्वावर घेण्यात आलेले होते त्यांची कामाची मुदत दि.०५/११/२००९ रोजी संपुष्टात आलेली आहे. कार्यालयीन कामकाजासाठी वाहनाची आवश्यकता असल्याने श्री.राजकुमार कासार यांनी वाहन पुरवठा पुढे चालु ठेवलेला आहे. तरी यास आणि याकामी दि.०६/११/०९ पासून १ वर्ष कालावधीसाठी येणा-या र.रु.२,००,०००/- अंदाजे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१७८ विषय क्रमांक- २९
दिनांक- ५.१.२०१० विभाग- जकात
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जकात/१०/कावि/५४६/०९ दि.३०/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केले प्रमाणे सन २००९-१० मध्ये असलेले जकात कराचे दर यात कोणतीही वाढ/घट न करता सन २०१०-२०११ करीता कायम करणेस व जकात दर समानीकरणाचा प्रस्ताव हरकत सुचनांसह शासनाकडे सादर केला असून शासनाने मान्यता दिले नंतर सुधारित दराने सन २०१० - २०११ या आर्थिक वर्षात शासनाकडुन जे दर मान्य होउन येतील त्या शासन आदेशाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१७९ विषय क्रमांक- ३०
दिनांक- ५.१.२०१० विभाग- दूरसंचार
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/१/कावि/२२०/०९ दि.३१/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

१३ विभागीय करसंकलन कार्यालयाचे दूरध्वनीवर On Line कामकाजाकरिता इंटरनेट प्लॅन र.रु.४०००/- सुरु केला आहे. २ विभागिय कार्यालयात तांत्रिक कारणास्तव तेथील दुरध्वनीवर इंटरनेट सेवा न घेता स्वतंत्र WLL दूरध्वनी घेण्यात येवुन त्यावर इंटरनेट प्लॅन र.रु.२५०/- (Rural Plan) सुरु केला आहे. १३ विभागिय कार्यालयातील दूरध्वनी वरिल इंटरनेट सेवेचे वाढीव खर्चास तसेच मोशी व च-होली विभागिय करसंकलन कार्यालय येथील WLL दूरध्वनी व त्यावरील इंटरनेट सेवा खर्चास पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१८० विषय क्रमांक- ३१
दिनांक- ५.१.२०१० विभाग- दूरसंचार
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/९३०/०९ दि.३०/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

श्री.प्रविण लडकत,प्रभारी कार्यकारी अभियंता (स्था) यांस ब्लॅकबेरी मोबाईल व सूविधा पुरविणेस व मोबाईल वापराची अधिकतम मर्यादा र.रु.२०००/- प्रतिमाह निश्चीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१८१ विषय क्रमांक- ३२
दिनांक- ५.१.२०१० विभाग- दूरसंचार
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. दूरसंचार/९२९/०९ दि.३०/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मोशी कचरा डेपो येथे कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल सूविधा वापराची अधिकतम मर्यादा किमान मासिक भाडे याप्रमाणे निश्चीत करुन पुरविणेस तसेच नोकिया मोबाईल मॉडेल क्र.५०३० या प्रकारचा एक मोबाईल नोकीया कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.स्काय लिंक, चिंचवड यांचेकडुन पूर्वस्विकृत दराप्रमाणे थेट पध्दतीने करारनामा न करता व निवीदा न मागविता प्रतिनग र.रु.२५२५/- प्रमाणे खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१८२ विषय क्रमांक- ३३
दिनांक- ५.१.२०१० विभाग- स्थापत्य (ड प्रभाग)
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/ड.मु./१२७२/०९ दि.३१/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

'थेरगाव वॉर्ड क्र.८४ मध्ये रस्त्याच्या कडेने तसेच अंतर्गत भागात इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे' या कामाचा महापालिका अंदाजपत्रकामध्ये समावेश नाही. त्यामुळे वरील कामाचा समावेश अंदाजपत्रकात करणे व कामाच्या खर्चास तरतुद करावी लागणार आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकीय र.रु. ३०,६६,१००/- एवढी येत आहे. त्यामुळे कामाचा खर्च मार्च २०१० अखेर किमान र.रु.५,००,०००/- व तद्नंतर र.रु.२५,६६,१००/- एवढा होणार आहे. सदरची तरतुद ही र.रु. ५,००,०००/- पान क्र.३७२.२ अ.क्र.६६ (लेखाशिर्ष - डांबरी रस्ते किरकोळ दुरुस्ती) वरुन जमा करावे, याप्रमाणे प्रस्ताव आलेला असल्याने त्याप्रमाणे त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-</u>

ठराव क्रमांक- १०१८३ विषय क्रमांक- ३४
दिनांक- ५.१.२०१० विभाग-जनता संपर्क व स्वागत कक्ष
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भ:-मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जा.क्र.जसं/१/कावि/२/२०१० दि.१/१/२०१०

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती महोत्सव समारंभ दि.३/१/२०१० व ४/१/२०१० रोजी आयोजित करण्यात आलेला असून सदर कार्यक्रमांसाठी नाट्यगृह भाडे, मराठी एकपात्री नाटक, दिपोत्सव, रांगोळी, फ्लेक्स

बॅनर व चहापान यासाठी अंदाजे र.रू.३२,०००/- [र.रू.बत्तीस हजार] खर्च अपेक्षित असल्याने सदर येणाऱ्या थेट पध्दतीच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१८४ विषय क्रमांक- ३५
दिनांक- ५.१.२०१० विभाग- आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमु/४/कावि/५९४/०९ दि.३१/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

मोशी कचरा डेपो येथे मुरूम पुरविणे या कामाची तातडी व महत्व विचारात घेता नि.नो.क्र.५/२००८-०९ चे प्रति ट्रक १ खेप यासाठी र.रू.७४०/- या मान्य निविदा दराच्या अनुषंगाने मे.गौरव ट्रान्सपोर्ट यांचेकडून दि.५/११/०९ पासून दि.२०/११/०९ अखेर ७०० खेपा मुरुम पुरविणे व पसरविणेकामी येणाऱ्या र.रू.५,१८,०००/- [र.रू.पाच लाख अठरा हजार] चे खर्चास व सदरचे काम करारनामा करून थेट पध्दतीने करणेस तसेच सदरचे दराने व अटी शर्तीनुसार मे.गौरव ट्रान्सपोर्ट यांस आणखी दोन वर्षे कालावधीकरीता मुरूम पुरविणेचे काम देण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१८५ विषय क्रमांक- ३६
दिनांक- ५.१.२०१०
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.जगदीश शेट्टी, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

खाली नमूद केलेल्या व्यक्तींस त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या पदी व मानधनावर सहा महिने कालावधीसाठी नेमण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| नाव | पदनाम | र.रु. |
|---|---|---|
| सारीका जगन्नाथ ओव्हाळ | कॉम्प्युटर ऑपरेटर | ७०००/- |
| गाडे प्रशांत सुर्यकांत | वायरमन निदेशक (औ.प्र.कें., मोरवाडी) | ५५००/- |
| वैशाली आत्माराम सोनावणे | समूह संघटक | ८०००/- |
| मंजुषा मनोज कुलकर्णी | समूह संघटक | ८०००/- |
| अनीता संदीप साकोरे | समूह संघटक | ८०००/- |
| सुरेखा भिमराव किर्दक | समूह संघटक | ८०००/- |
| चंचला रामराव जमधडे | समूह संघटक | ८०००/- |
| संजीव विठ्ठल धुळम | समूह संघटक | ८०००/- |

| | | |
|---|---|---|
| मिलिंद आण्णासाहेब डोंगरे | समूह संघटक | ८०००/- |
| सुरेखा आढाव | समूह संघटक | ८०००/- |
| जावजी किसन पोटे | समूह संघटक | ८०००/- |
| कल्पना कारभारी कातकडे | समूह संघटक | ८०००/- |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१८६ विषय क्रमांक- ३७
दिनांक- ५.१.२०१०
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ- मा.नितीन ओव्हाळ, मा.जगदीश शेट्टी यांचा प्रस्ताव ...

सोमवार, दिनांक २८/१२/२००९ रोजी पिंपरीतील रमाबाईनगर जवळील पत्रा शेडवर झाड कोसळल्याने सहा घरांचे किरकोळ नुकसान झालेले असून झाड पडल्याने व्दारका ज्ञानोबा पांढरे, मंदाबाई निकाळजे, चंद्रकांत अंबादास सरवदे, पद्मिनीबाई रामाजी धोन्दे, सुनिल अंगरथ व सोमा रामजी धोन्दे यांच्या घरांचे नुकसान झालेले असल्याने या नागरीकांना झालेल्या नुकसानी बद्दल महानगरपालिके तर्फे नुकसान भरपाई देण्यात यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१८७ विषय क्रमांक- ३८
दिनांक- ५.१.२०१० विभाग-
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.मनोहर पवार
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/२११/०९ दि.१/१/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१५/२००९-१० अन्वये, चिंचवड येथील मनपाच्या आरक्षित जागेत प्रादेशिक विज्ञान केंद्राच्या इमारतीस सिमाभिंत बांधणेकामी मे.श्रीनाथ कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१७,९०,०००/- [र.रू.सतरा लाख नव्वद हजार] पेक्षा १७.१९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१४,८२,२९९/- [र.रू.चौदा लाख ब्याऐंशी हजार दोनशे नव्यान्नव] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१८८ विषय क्रमांक- ३९
दिनांक- ५.१.२०१०
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ- मा.राजेश पिल्ले, मा.जगदीश शेट्टी यांचा प्रस्ताव ...

मनपाच्या तर्फे नागरीकांच्या सोयीसाठी बांधण्यात आलेल्या वल्लभनगर चौकातील सब-वे तसेच चिंचवड येथील बिग बाजार ते डी मार्ट पर्यंतचा रस्ता ओलांडून जाणाऱ्या नागरीकांच्या सोयीसाठी बांधण्यात आलेला भुयारी पादचारी मार्ग या दोन्ही ठिकाणी मनपाचा आर्थिक फायदा लक्षात घेता मनपाच्या धोरणाप्रमाणे मे.बिग इंडिया ग्रुप या संस्थेस आतिल बाजूस व दर्शनिय भागाच्या उपलब्ध जागेवर जाहीरात करून त्यामधुन मिळणाऱ्या उत्पन्नातून सदर सब-वे व भुयारी मार्गाची देखभाल करण्यास मनपा बरोबर करार करून व मनपाच्या अर्टी शर्तीप्रमाणे ५ वर्षा करिता परवानगी देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- १०१८९ विषय क्रमांक- ४०
दिनांक- ५.१.२०१०
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा. राजेश पिल्ले
संदर्भ- मा.सुरेखा साळुंखे,राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव ...

पिं.चिं.मनपा कडे सर्व विभागांमध्ये दैनंदिन जमा होणारी सर्व रोख रक्कम मनपाचे नावे असणारे धनादेश मनपा निर्देश देईल त्याठिकाणी जमा करणेकरीता मे.न्याती इन्फोसिस व आय.सी.आय.सी.आय.बँक यांची नेमणुक मनपाकरीता ई - गव्हर्नन्सचे सॉफ्टवेअर बनविणेचे सर्व काम विनामोबदला करुन देणेचे अटीवर करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/४४/२०१०
दिनांक - ७/१/२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.